**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५/आषाढ १०, १९४७ (शके)**

## :: औचित्याचे मुद्दे स्वीकारणे व त्यावरील कार्यवाही ::

**७७.** मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार औचित्याचे मुद्दे **PROIS** या संगणक प्रणालीव्दारे संपूर्णत: ऑनलाईन (**online**) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. औचित्याच्या मुद्दयाबाबतची बाब दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आली असेल त्याच दिवशी मा. सदस्यांना जो औचित्याव्दारे मुद्दा उपस्थित करावयाचा असेल तोच मुद्दा त्यांनी **PROIS** या संगणक प्रणालीव्दारे संपूर्णत: ऑनलाईन (**online**) पध्दतीनेच सकाळी ७.३० ते ०९.३० वाजेपर्यंत या सचिवालयाकडे पाठवावा ऑफलाईन (**Offline**) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या मुद्द्यांपैकी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी मान्य केलेल्या मुद्दयांचे सकाळी १०.३० वाजता तसेच मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार सचिव- १ यांच्या कार्यालयात बॅलट काढण्यात येईल व एका वेळी एकूण २५ मुद्दे सदस्य निहाय घेण्यात येतील. **तसेच सन्माननीय सदस्यांनी संगणकीय प्रणालीव्दारे सादर केलेला व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी मान्य केलेला एकच मुद्दा सभागृहात उपस्थित करणे आवश्यक आहे. एका पेक्षा अधिक व एका पेक्षा अधिक विभागांशी संबंधित असलेला मुद्दा ग्राहय धरण्यात येणार नाही.**

बॅलटमध्ये आलेल्या २५ औचित्याच्या मुद्दयांची सूची सचिव-१ यांच्या दालनात तसेच जेथे सन्माननीय सदस्यांचा उपस्थिती पट ठेवण्यात येतो तेथे ठेवण्यात येईल. बॅलटमध्ये आलेल्या सन्माननीय सदस्यांनी त्याच दिवशी औचित्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित न केल्यास तो मुद्दा व्यपगत समजण्यात येईल व त्यावर पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४) सचिव- १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.
५) सचिव- २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.
६) सचिव- ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.
७) सचिव- ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
१०) संगणक कक्ष (**WEBSITE**)
११) एम.के.सी.एल.